RNI No. MAHBIL /2009/35529

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक २७] गुरुवार ते बुधवार, जुलै २-८, २०२६/आषाढ ११-१७, शके १९४८ [पृष्ठे ११ किंमत : रुपये १४.००

### प्राधिकृत प्रकाशन

**शासकीय अधिसूचना, नेमणूका इत्यादी**

### जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडून

**अधिसूचना**

क्रमांक न्या.अ./३५०८/२०२६.—श्रीमती एस. व्ही साळवी, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पनवेल यांची शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१७/प्र.क्र. २५/सेवा-६, मंत्रालय, मुंबई, दिनांक २३ जुलै २०१८ व मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडील पत्र क्रमांक Rule/P 1604/2018/163, dated 21st August 2018 अन्वये दिनांक १० जून २०२६ ते दिनांक २४ जून २०२६ या कालावधीतील एकूण १५ दिवसांची बालसंगोपन रजा मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एस. व्ही साळवी, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ, स्तर, पनवेल म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एस. व्ही साळवी, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पनवेल या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्रीमती एस. व्ही साळवी, ह्या रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढण्यात यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

सदरहू रजेची नोंद संबंधित न्यायीक अधिकारी यांच्या सेवापुस्तकात ठेवण्यात यावी.

**एस. बी. अग्रवाल,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,
दिनांक ९ जून २०२६.

## जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक न्या.अ./३५०९/२०२६.—श्रीमती एस. व्ही. साळवी, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पनवेल यांची दिनांक २ जून, २०२६ ते दिनांक ४ जून २०२६ रोजीची एकूण ०३ दिवसांची परावर्तीत रजा पूर्वलक्षीप्रभावाने मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एस. व्ही साळवी, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पनवेल म्हणून पुनर्नियुक्ती करण्यांत येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेंत येत आहे की, श्रीमती एस. व्ही साळवी, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पनवेल या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्रीमती एस. व्ही साळवी, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढण्यात यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार जिल्हा न्यायालयाचे स्थायी आदेशाप्रमाणे होता.

**एस. बी. अग्रवाल,**<br>
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,<br>
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,<br>
दिनांक ९ जून २०२६.

---

## जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रा.अ./३५१०/२०२६.—श्री. आर. वाय. खंडारे, ५ वे सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल यांची दिनांक ९ जून २०२६ ते दिनांक ११ जून २०२६ रोजीची एकूण ०३ दिवसांची अर्जित रजा मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. आर. वाय. खंडारे, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची ५ वे सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेंत येत आहे की, श्री. आर. वाय. खंडारे, हे अधिकारी जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर ५ वे सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

श्री. आर. वाय. खंडारे, हे अधिकारी रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढण्यात यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. आर. एन. चव्हाण, ६ वे सहदिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल यांचेकडील राहिल.

**एस. बी. अग्रवाल,**<br>
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,<br>
रायगड-अलिबाग.

रायगड-अलिबाग,<br>
दिनांक ९ जून २०२६.

## नगरविकास विभाग

मंत्रालय, ४ था मजला, मुख्य इमारत, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ जून २०२६.

## अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टीपीएस-१२२५/७३३/प्र.क्र.१२४/२५/नवि-१२.—ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारित विकास योजना (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे.) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) च्या कलम ३१(१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२९७/१३१९/प्र.क्र.१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर १९९९ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतूदीनुसार शासन, नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२०१/२७४/प्र.क्र. २८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल २००३ रोजी मंजूर झाली असून दिनांक १४ मे २००३ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमधील सेक्टर ४ च्या विकास योजनेनुसार मौजे पाचपाखाडी, ता. ठाणे, येथील सं.नं. ५३१, ५३२, ५३३ आणि १२२/१ (पै), क्षेत्र सुमारे ३२८०.६९ चौ.मी. ही जमीन (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे.) नाला म्हणून दर्शविण्यात आली आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त निर्देशन " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी विकास प्राधिकरण (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्राधिकरण " असा करण्यात आला आहे.) उक्त अधिनियमातील कलम ३७(१ब) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून " उक्त जमीन " उक्त निर्देशनामधून वगळून अस्तित्वातील नाल्यालगत ६.०० मी. रूंदीचा रस्ता दर्शविण्यास रहिवास विभागात समाविष्ट करण्याचा फेरबदल प्रस्ताव दिनांक ६ मे २०२५ च्या पत्रान्वये शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदल अटीसापेक्ष मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या उक्त अधिनियमाच्या कलम १५४ अन्वये दिनांक २० एप्रिल २०१६ रोजी दिलेल्या निदेशास अनुसरून संबंधित जमीन धारकांनी प्रचलित वार्षिक मुल्यदर तक्त्यानुसार येणाऱ्या जमिनी मुल्याच्या ५ % दराने येणाऱ्या रक्कमेपैकी शासन देय असलेल्या ५० % अधिमूल्याची रक्कम रुपये ७,०९,३२५ सहाय्यक संचालक, नगररचना शाखा कार्यालय, ठाणे यांचेमार्फत शासकीय कोषागारात चलन क्रमांक MH ००२४३८६०९२०२६२७ P, दिनांक १२ मे २०२६ रोजी आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली रक्कम रुपये ७,०९,३२५ मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे डीमांड ड्राफ्ट क्र. ५०२२०५, दिनांक १२ मे २०२६ अन्वये भरणा केला आहे.

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोट-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून शासन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदल अटीसापेक्ष मंजूर करीत आहे. आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजूरीच्या अधिसूचनेतील फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे ;

## नोंद

"मंजूर विकास योजना ठाणे च्या भाग नकाशात दर्शविल्यानुसार मौजे पाचपाखाडी, ता. ठाणे येथील सं. नं. ५३१, ५३२, ५३३ व १२२/१(पै), ही जमीन "नाला" निर्देशांमधून वगळण्यात येत आहे व असे वगळलेले क्षेत्र अस्तित्वातील नाल्यालगत ६.०० मी. रुंदीचा रस्ता दर्शविण्यासह व खालील अटीसापेक्ष रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे ;

**अट**.— सदर भूखंडावरील पुनर्विकास करताना, अस्तित्वातील नाल्याचे बांधकाम, नगर अभियंता, ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजीच्या पत्रासोबत जोडलेल्या नकाशामध्ये दर्शविल्यानुसार अस्तित्वातील नाल्याची रुंदी कमी न करता, नाल्यालगत किमान ६.०० मी. रुंदीचा सेवा रस्त्याचे बांधकाम तसेच नाल्याच्या भिंतीचे बांधकाम स्वखर्चाने करून त्याची देखभाल करणे संबंधित विकासकावर बंधनकारक राहील. तसेच अस्तित्वातील नाल्याबाबत ठाणे महानगरपालिकेचे अधिकार अबाधित राहतील.

२. सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

३. उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खालील नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

(१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(२) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी-मुंबई.

(३) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

४. सदर अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in*.वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजिंक्य पवार,**
कार्यासन अधिकारी.

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032,

dated 25 June 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

No. TPS-1225/733/C.R.124/25/UD-12.—Whereas, the Revised Development Plan of the city of Thane (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned partly by the Government in the Urban Development Department, under Section 31*(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") *vid*e Notification No. TPS-1297/ 1319/CR-148/ 97/UD-12, dated the 4th October, 1999 (hereinafter referred to as "the said Notification") and has come into force with effect from 22nd November, 1999 and the Excluded Part of the said Development Plan has been sanctioned by the Government in Urban Development Department under Section 31(*1*) of the said Act, *vide* Notification No. TPS- 1201/274/CR-28/2009/ UD-12, dated the 3rd April 2003, and has come into force with effect from 14th May 2003 ;

And whereas, in Sector-4 of the said Development Plan, an area admeasuring 3280.69 sq.mt. of land bearing S. No.531, 532, 533 and 122/l(pt.) of village Pachpakhadi. Tal. Thane (hereinafter referred to as " the said land ") are shown as Nalla (hereinafter referred to as "the said designation") ;

And whereas, Mumbai Metropolitan Regional Slum Rehabilitation Authority (hereinafter referred to as "the said Authority"), after following the legal procedure under sub-section *(1-B)* of Section 37 of the said Act, has submitted a proposal for modification in the said Development Plan so as to delete the said land from the said designation and to include the same in Residential Zone along with the 6.00 mt. wide road adjacent to existing Nalla, to the Government for sanction, *vide* letter dated 6th May 2025 (hereinafter referred to as "the Proposed Modification") ;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to sanction the Proposed Modification with condition ;

And whereas, as per the directives under section 154 of said Act, given by the Government *vide* dated 20th April 2016, the owner of the said land have deposited the premium amount of Rs.7,09,325/- towards 50% share payble to Government in the Government treasury through Assistant Director of Town Planning, Thane Branch *vide* challan No.MH002438609202627P, dated 12th May 2026 and deposited the premium amount Rs. 7,09,325/- towards 50% share payble to Planning Authority in the office of Mumbai Metropolitan Regional Slum Rehabilitation Authority, *vide* Demand Draft No. 502205, dated 12th May 2026 out of the total premium amount at the rate of 5% land value as per the prescribed in the current Annual Statement of Rate.

Now, therefore, in exercise of the powers conferred under Sub-section *(2)* of Section 37 of the said Act and all other powers enabling it in that behalf, the State Government hereby sanctions the Proposed Modification with condition and for that purpose in the Schedule of modifications appended with the said Notification, after the last entry, the following new entry shall be inserted *viz*:—

**ENTRY**

"As shown on the part plan of the sanctioned Development Plan of the Thane, land bearing S. No.531, 532, 533 and 122/1(pt.) of village Pachpakhadi, Tal. Thane are deleted from the designation of 'Nalla' and land so deleted are shown as 6.00 mt. wide road adjacent to existing Nalla and included in Residential Zone subject to following condition.

*Conditon*.— While carrying out redevelopment of the plots at the said location, it shall be binding on developer to construct existing Nalla without reducing width of existing Nalla & to construct 6.00 mt. wide service road adjacent to Nalla at his own cost as shown on plan attached with letter dated 16/1/2025 of City Engineer, Thane Municipal Corporation. Further it shall be binding on developer to maintain it. The rights of the Thane Municipal Corporation in respect of existing Nalla shall remain unaffected."

2. The date of publication of this Notification in the *Maharashtra Government Gazett*e is fixed as the date of coming into force of this sanctioned modification.

3. The Part Plan of aforesaid sanctioned modification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month :—

(*i*) The Commissioner, Thane Municipal Corporation, Thane.

(*ii*) The Joint Director of Town Planning, Konkan Division Konkan Bhavan, Navi Mumbai.

(*iii*) The Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

4. This notification is also published on the Government Website at *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJINKYA PAWAR,
Section Officer.

## जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी (नागरी क्षेत्र कमाल धारणा), बृहन्मुंबई यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक सी/युएलसी/डे-V/६(१)/SR-XI-५५९/कावि-६८/२०२६.—ज्याअर्थी, **महाराष्ट्र शासन राजपत्र**, दिनांक २८ सप्टेंबर २००० च्या भाग एक (को.वि.पु.) १९९, पृष्ठ क्र. १५८८ वर प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेत श्री. धर्मा काशिनाथ माळी यांनी धारण केलेली खालील अनुसूचित दाखविलेली जमीन ही कमाल मर्यादेपेक्षा अधिक असल्यामुळे ती जमीन महाराष्ट्र शासनाद्वारे संपादित केली जावयाची आहे हे नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम १० पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित करण्यात आले होते. त्यानंतर ती जमीन सर्व भारांपासून मुक्त अशी महाराष्ट्र शासनाकडे सर्वार्थाने निहित होईल असे **महाराष्ट्र शासन राजपत्र,** दिनांक ११ जानेवारी २००७ च्या भाग एक, पृष्ठ क्रमांक २१४ व प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेत उक्त अधिनियमाच्या कलम १० पोट-कलम (३) प्रमाणे अधिसूचित करण्यात आले आहे;

ज्याअर्थी, नाजकधा अधिनियमांतर्गत कलम १० पोट-कलम (१), (३) व (५) अन्वये भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे. कलम १० पोट-कलम (३) व पोट-कलम (५) च्या कार्यवाहीच्या अनुषंगाने विवरणपत्रधारक श्री. धर्मा काशिनाथ माळी यांनी धारण केलेल्या खालील अनुसूचित नमूद जमिनीच्या अधिकार अभिलेखातील भोगवटादार सदरी तसेच इतर हक्कात ‘ महाराष्ट्र शासन ’ अशी नोंद घेण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणी शुद्धीपत्रक पत्र क्रमांक C/ULC/Desk-V/SRIX/559/559/185/A,B,C,D/D-V, दिनांक १८ डिसेंबर १९९८ रोजीचे शुद्धीपत्रकान्वये अतिरिक्त मोकळे क्षेत्र निरंक घोषित केल्याने, मौजे शिंपोली, ता. बोरीवली येथील अंतिम भूखंड क्रमांक ४६५ या मिळकतीमधील २९४.०० चौ.मी. या क्षेत्राकरिता नाजकधा कलम १०(३) व १०(५) नुसार मिळकत पत्रिकाधारक सदरी दाखल केलेली ‘महाराष्ट्र शासन’ नोंद कमी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

त्याअर्थी, उपरोल्लिखीत **महाराष्ट्र शासन राजपत्र**, दिनांक ११ जानेवारी २००७ च्या भाग एक, पृष्ठ क्रमांक २१४ वर प्रसिद्ध झालेली नाजकधा कलम १०(३) ची अधिसूचना खालील नमूद क्षेत्राकरिता रद्द (De-Notified) करण्यात येत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | जिल्हा | गाव | तालुका | न.भू.क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई उपनगर | शिंपोली | बोरीवली | ४६५ | २९४.०० |
| | | | | **एकूण** | **२९४.००** |

**सतिश बागल,**
जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी,
(ना.क्षे.क.धा.) बृहन्मुंबईकरिता.

वांद्रे (पूर्व), मुंबई,
दिनांक २३ जून २०२६.

## जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांजकडून

### आदेश

क्रमांक जिऊनि/मुंबई १/कक्ष ३/कलम १५६/आदेश/२०२६.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, श्री नितिन काळे, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर या आदेशान्वये बामणे जनसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई, ४/९ वाणी चाळ, पोदारमिल समोर, ना. म. जोशी मार्ग, मुंबई ४०० ०११, या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये प्राप्त वसुली प्रमाणपत्राची कलम ९१ अन्वये मा. सहकार न्यायालयाकडील प्राप्त हुकूमनाम्याची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम, १०७ अनुसार मालमत्ता जप्त करुन व तिची विक्री करुन रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार व मालमत्तेची वाजवी किंमत निश्चितीचे अधिकार तसेच मालमत्ता विक्री कायम करण्याचे अधिकार खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून दिनांक ३१ मार्च २०२९ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. दत्तात्रय दिनकर डावरे | संचालक | विशेष वसुली व विक्री अधिकारी | बृहन्मुंबई |

**अटी.—**

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम, १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१/९८/९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी दरमहा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रपत्र १,२,३, ४ व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती संबंधित उप निबंधक/सहायक सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दिनांक ६ एप्रिल २०१८ चे आदेशान्वये वसुली अधिकारी यांनी वसूल करावयाच्या हुकूमनाम्याच्या वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (Cost of Process) निश्चित केला असून त्यानुसार वसुलीच्या टप्प्यावर आदेशिकेचा खर्च संबंधित थकबाकीदारांकडून वसूल करावा. तसेच आदेशामध्ये निश्चित केलेल्या हुकूमनाम्याच्या/ वसुलीच्या दाखल्याच्या आदेशिकेचा खर्चाच्या दराने वसूल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही.

(६) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १९४२/२०१३, दि बेसिन कॅथोलिक को. ऑप. बँक विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

(७) कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तत्काळ काढून घेण्यात येतील. तसेच वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(८) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण १५०४/ प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिहांच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

( ९ ) वसुली अधिकाऱ्यांस त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट" "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दाचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी ( महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये )" असे लिहावे.

( १० ) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपाती बाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार / जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचे मार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

( ११ ) वसुली अधिकाऱ्याने मा. सहकार आयुक्त यांचेकडील परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

( १२ ) कलम १०१ खालील वसुली दाखल्याप्रमाणे कर्जाची वसुली करताना प्रथम कर्जदाराकडील जंगम व स्थावर मालमत्ता, तद्नंतर प्रथम जामीनदाराकडील जंगम व स्थावर मालमत्ता व त्यानंतर पुढील जामीनदाराकडील जंगम व स्थावर मालमत्ता या क्रमाने कर्जवसुलीचे प्रक्रिया राबवावी.

मुंबई,
दिनांक १४ मे २०२६.

**नितिन काळे,**
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, मुंबई ( १ ) शहर.

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
# महाराष्ट्र राज्य, पुणे यांजकडून

## आदेश

क्रमांक पतसंस्था/सआ-५/कलम १५६/आदर्श ना. सह.पत/२६/१२२०.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, डॉ. पी. एल. खंडागळे, अपर निबंधक, सहकारी संस्था, (पतसंस्था), महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशाद्वारे आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी / कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम, १९६१ मधील नियम,१०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधिन राहून या आदेशाच्या दिनांकापासून दिनांक ३१ मार्च २०२९ या कालावधी करीता प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रितेश चंद्रकांत नाईक | असिस्टंट जनरल मॅनेजर | विशेष वसुली व विक्री अधिकारी | संस्थेच्या कार्यक्षेत्रापुरते |
| २ | श्री. सुभाष सिताराम माळी | जनरल मॅनेजर | | |
| ३ | सौ. ग्रिष्मा अभिजीत सातामकर | असिस्टंट जनरल मॅनेजर | | |
| ४ | श्री. किशोर शिवाजी खामकर | वसुली अधिकारी | | |

**अटी.—**

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम, १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम, यातील तरतुदी व या कार्यालयाकडील परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले या कार्यालयाकडील अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त संस्थेच्या वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी दरमहा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रपत्र १,२,३, व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास व या कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग, दोन विभाग अथवा राज्य कार्यक्षेत्र आहे त्या संस्थांनी देखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उप निबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(६) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण - १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोंव्हेबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही. या कार्यालयाकडील दिनांक ६ जून २०१९ च्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

(७) वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट ", " एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे "वसुली अधिकारी (महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम, १०७ अन्वये ) " असे लिहावे.

(८) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग" असा फलक लावता येऊ शकेल.

(९) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार / जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१०) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व दिनांक ६ एप्रिल २०१८ रोजीचे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशामध्ये निश्चित केलेल्या हुकुमनाम्याच्या / वसुलीच्या दाखल्याच्या आदेशिकेचा खर्चाच्या (Cost of Process) दराने वसूल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही. सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवावयाचा असून, त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरिक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

(११) वसुली अधिकाऱ्याने या कार्यालयाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ व दिनांक ११ जुलै २०१९ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(१२) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस/आदेश/घोषणापत्र यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

(१३) संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापक यांनी वसुली दाखल्याबाबत दाखल प्रकरणे व संख्यात्मक आढावा तसेच प्रपत्र क्र. १ ते ४ मध्ये वसुली अधिकारी निहाय वसुली कामकाजाचा दरमहा आढावा घ्यावा.

पुणे,
दिनांक ४ मे २०२६.

**डॉ. पी. एल. खंडागळे,**
अपर निबंधक (पतसंस्था),
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.